# प्रेसनोट

## Telegram ग्रुपद्वारे इन्वेस्टमेंट फ्रॉडचे रॅकेट चालवणाऱ्या गुन्हेगारांना ‘OTP फार्मिंग’ द्वारे बनावट व्हॉट्सऍप अकाउंट पुरवणाऱ्या आरोपींना अटक

**गुन्ह्याची थोडक्यात माहिती**

सायबर पोलीस ठाणे पश्चिम विभाग, गुन्हे शाखा, गु.अ.वि., मुंबई येथे नोंद गु.र.क्र.१०८/२०२६ कलम ३१८(४), ३१९(२), ३३६(२), ३३६(३), ३३८, ३४०(२), ३(५), ६१(2) भा.न्या.सं. सह ६६ क, ६६ ड माहिती तंत्रज्ञान कायदा या गुन्ह्यामधील तक्रारदार यांना पाहिजे आरोपी यांनी व्हॉट्सऍप द्वारे संपर्क करून प्रथितयश गुंतवणुक कंपनीमधून बोलत असल्याचे भासवून त्यांच्या कंपनीमार्फत शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळवून देण्याच्या आमिषाने एकूण 22,30,000/- रुपये वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये भरावयास भाग पाडून फसवणूक केली आहे.

**अटक आरोपी**

| अ.क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | गुन्ह्यातील भूमिका | जप्त मुद्देमाल |
|---|---|---|---|
| 1 | प्रमोद कुमार S/O राजकुमार उर्फ बिपिन | व्हॉट्सऍप OTP फार्मिंग- वेगवेगळ्या POS धारक एजंटकडून बनावट सिमकार्ड प्राप्त करुन, त्यांच्या वापर करून त्याद्वारे बनावट व्हॉट्सऍप अकाऊंट तयार कारणे व त्याचे OTP टेलिग्राम व सिग्नल ऍप द्वारे भारताबाहेर कंबोडिया येथील आरोपींना देणे. | ➢ 100 मोबाईल हँडसेट (91 कीपॅड सॅमसंग गुरु मोबाईल, 9 स्मार्ट फोन)<br>➢ 669 SIM Cards<br>➢ 1 Dell कंपनीचा Computer CPU व Wi-Fi Router<br>➢ 120 मोबाईल बॅटऱ्या आणि 20 चार्जर<br>➢ 02 चेकबुक्स आणि 01 पासबुक |
| 2 | धर्मेंद्र गुप्ता S/O राजेंद्र गुप्ता | बनावट सिम कार्ड पुरवठा एजंट- आरोपी क्र. 1 ला आरोपी क्र. 3 व इतर POS धारक सिमकार्ड विक्रेते यांचेकडून बनावट सिम कार्ड पुरविणे | ➢ 2 अँड्रॉईड मोबाईल |
| 3 | राजीव कुमार गुप्ता S/O मदनलाल गुप्ता | POS धारक- वेगवेगळ्या व्यक्तींच्या नावे त्यांच्या नकळत बनावट सिमकार्ड चालू करून कमिशनच्या बदल्यात आरोपी क्र. 2 ला पुरवणे | ➢ अँड्रॉईड मोबाईल<br>➢ ऑप्टिकल फिंगरप्रिंट स्कॅनर |

**गुन्ह्याची कार्यपद्धती :-**

**1. OTP Farming – (आरोपी क्र. 1 ची मुख्य भूमिका) :**

अटक आरोपी क्र. 1 प्रमोद कुमार उर्फ विपिन व त्याचे साथीदार दिल्ली व इतर ठिकाणी साध्या मोबाईलचा (Keypad Phones) वापर करून ‘OTP Farming’ चा सेटअप चालवतात. यामधून ते बनावट SIM Cards वरून फक्त OTP Generate करतात आणि कंबोडिया/परदेशातील मुख्य सूत्रधारांना Telegram द्वारे 13 डॉलर्स (USDT) मध्ये विक्री करतात.

**2. बनावट SIM Cards चा पुरवठा :**
अटक आरोपी क्र. 3 राजीव गुप्ता व त्याच्यासारखे इतर SIM Card विक्रेते (POS Agents) पैशांच्या आमिषापोटी बेकायदेशीररीत्या शेकडो बनावट SIM Cards ॲक्टिव्हेट करून ते आरोपी क्र. 1 व 2 यांना पुरवतात.
**3. भारतीयांची फसवणूक :**
कंबोडिया/परदेशातील मुख्य सूत्रधार आरोपी क्र. 1 प्रमोद कुमार उर्फ विपिन याने पुरविलेल्या भारतीय नंबरवर WhatsApp चालू करून, भारतातील नागरिकांना शेअर मार्किट गुंतवणुकीवर चांगल्या परताव्याचे आमिष दाखवून देऊन त्यांची आर्थिक फसवणूक करतात.
**4. Mule Accounts व Crypto wallet चा वापर :**
फसवणुकीची रक्कम भाड्याने घेतलेल्या Bank Accounts मध्ये वळवली जाते आणि आरोपी क्र. 1 प्रमोद कुमार उर्फ विपिनसारखे दलाल आपला मोबदला Crypto Currency मध्ये स्वीकारतात.

**तपास पथक-**

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. अनिल कुंभारे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. कृष्णकांत उपाध्याय, मा. पोलीस उपायुक्त बजरंग बनसोडे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त सुवर्णा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.

सदर कारवाईमध्ये प्र. पो.नि. संदीप पाटील, स.पो.नि. नितीन गच्चे, स.पो.नि. अमोल माळी, स.पो.नि. विजय घोरपडे, पो.उनि. दिपक तायडे, पो.उ.नि. अविनाश नलावडे, पो.ह. शशांक चिले, पो.शि. विजय जाधव , पो.शि. अनिल वारे, पो.शि. संग्राम जाधव, पो.शि. सुरेश लोकरे, पो.शि. अमोल फापळे, पो.शि. मयूर इंगळे, पो.शि. आकाश राडे, पो.शि. संकेत निगडे, पो.शि. संग्राम पाटील यांनी परिश्रम घेतले आहेत.

**सायबर सुरक्षा सूचना**

1. कोणतीही व्यक्ती नामांकित Investment Company, Stock Market Expert, Broker किंवा Financial Advisor असल्याचे सांगत असल्यास त्याची अधिकृत वेबसाइट, SEBI Registration Number व इतर अधिकृत माहिती स्वतंत्रपणे तपासल्याशिवाय गुंतवणूक करू नये.
2. "कमी कालावधीत मोठा नफा", "हमीचा परतावा", "VIP Trading Account", "Special IPO", "Guaranteed Profit" किंवा "Double Return" अशा आकर्षक आश्वासनांना बळी पडू नये.
3. अनधिकृत व्यक्तीने पाठविलेल्या Link वर क्लिक करून Banking, Trading किंवा Investment App मध्ये Login करू नये आणि आपली Login Credentials कोणालाही देऊ नयेत.
4. सायबर फसवणूक झाल्यास तात्काळ 1930 हेल्पलाईनवर संपर्क साधावा तसेच National Cyber Crime Reporting Portal वर तक्रार नोंदवावी.